## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ४

सभावृत्तांत

दिनांक १०/११/२०१७ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर २०१७ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक १०/११/२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ३) | मा. श्रीमती ममता विनायक गायकवाड | सदस्या |
| ४) | मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ५) | मा. श्रीमती कुटे निर्मला संजय | सदस्या |
| ६) | मा. श्री. विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्् |
| ७) | मा.श्री. सागर आंगोळकर | सदस्य |
| ८) | मा.श्रीमती मुंढे उषा अंकुश | सदस्या |
| ९) | मा. श्रीमती लोखंडे चंदा राजू | सदस्या |

-----------------

याशिवाय, मा. सिताराम बहुरे, क्षेत्रीय अधिकारी, तथा प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. संदेश खडतरे, उपअभियंता, बीआरटीएस, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. एच.आर. सरवदे, कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण, मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. पाटील एस. वाय.,मा. संध्या वाघ, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. एस.बी. पाटील, कनिष्ठ अभियंता, झोनिपू स्थापत्य, मा. रोकडे जयवंत, मा. मुलाणी बी.एम., मा. ढोले बी.आर. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. प्रवीण धुमाळ, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. भालेराव यु.ए., मा. महेश कावळे, कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. विजय सोनवणे, मा. खोत एस.एच. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. आर.एम. सौदाई, मा. शशिकांत मोरे, आरोग्य निरीक्षक, मा. अमर मद्रासी, मलेरिया निरीक्षक, मा. सी.सी. मोरे. हॉर्टीकल्चर सुपरवायझर, मा. पटेल जे.व्ही. उद्यान निरीक्षक, मा.

एन.एस. पारसी. आरोग्य निरीक्षक, पशु वैद्यकीय विभाग, मा.दुदुसकर एस.एस., उद्यान सहाय्यक, मा.लक्ष्मण काळे, मा. एम.पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव** : दिनांक १०/११/२०१७ रोजीच्या माहे नोव्हेंबरच्या नियमित ड प्रभाग समिती सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

**सन्मा. सदस्यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१**: प्रभाग क्र. २५ पुनावळे गाव कोयते वस्ती चौक येथे मोठया प्रमाणात रहदारी असते. सदर ठिकाणची रहदारी आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता त्या ठिकाणी सार्वजनिक मुतारीची सोय असणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी नागरीकांना सार्वजनिक मुतारी उपलब्ध नाही. नागरीकांच्या मागणीनुसार सदर चौकामध्ये सार्वजनिक मुतारी बसविणेबाबत

**विषय क्र.** २ : प्रभाग क्र. २६ (वाकड- पिंपळे निलख) येथील १६ नंबर या ठिकाणी नव्याने होणा-या सब-वेला कावेरी सब–वे नाव देणेबाबत

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे नोव्हेंबर २०१७ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ३ माहे ऑक्टोबर २०१७ च्या मासिक सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ३ माहे ऑक्टोबर २०१७ च्या मासिक सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** : माहे नोव्हेंबर २०१७ च्या कार्यपत्रिका क्र. ४ वर कोणतेही विषय नसल्याने सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा.सभापती यांचे मान्यतेने दिनांक १०/११/२०१७ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. ७

दिनांक १०/११/२०१७ विभाग: आरोग्य विभाग

सूचक : मा. श्रीमती रेखा राजेश दर्शले अनुमोदक : मा. श्री. सागर सुनिल आंगोळकर

संदर्भ : मा.श्रीमती रेखा राजेश दर्शले यांचेकडील दि. १०/११ /२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २५ पुनावळे गाव कोयते वस्ती चौक येथे मोठया प्रमाणात रहदारी असते. सदर ठिकाणची रहदारी आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता त्या ठिकाणी सार्वजनिक मुतारीची सोय असणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी नागरीकांना सार्वजनिक मुतारी उपलब्ध नाही. नागरीकांच्या मागणीनुसार सदर चौकामध्ये सार्वजनिक मुतारी बसविणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

विषय क्र. २ ठराव क्र. ८

दिनांक ०६/१०/२०१७ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा.सौ. ममता विनायक गायकवाड अनुमोदक : मा.सौ. आरती सुरेश चोंधे

संदर्भ :मा. सौ. ममता विनायक गायकवाड यांचा दिनांक १०/११/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ (वाकड- पिंपळे निलख) येथील १६ नंबर या ठिकाणी नव्याने होणा-या सब-वेला कावेरी सब–वे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

त्यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. नगरसदस्यांनी ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कार्यरत विविध विभागांकडील कामकाजाबाबत त्यांचे मत प्रदर्शित केले.

**मा. सभापती**: दिनांक १०/११/२०१७ रोजीचे सभेमध्ये सन्मा. नगरसदस्य व अधिकारी वर्ग यांचेमध्ये चर्चा होऊन जे विषय चर्चिले गेले आहेत त्या विषयासंबंधी अधिका-यांनी तातडीने कार्यवाही करावी व मागच्या प्रभाग समितीमध्ये सर्व विभागांना सन्मा. नगरसदस्य यांचे कार्यालयात प्राप्त होणा-या नागरीकांच्या तक्रारी/सूचना ताब्यात घेऊन विभागप्रमुखांना देणेकामी एका कर्मचा-याची नेमणूक करणेबाबत मागील बैठकीत ठरले होते परंतु आरोग्य विभाग सोडून इतर कोणत्याही विभागाकडून या कामी कोणत्याही कर्मचा-याची नेमणुक करण्यात आलेली नाही. तरी क्षेत्रीय अधिकारी यांनी संबंधितांना सूचना देणेत याव्यात व प्रत्येक नगरसदस्यांच्या कार्यालयात ज्या तक्रारी असतात त्या घेऊन जाण्याच्या सूचना देणेत याव्यात.

क्षेत्रीय कार्यालयातील विविध विभागांकडून अडचणींबाबत माहिती प्राप्त करुन घेणेत आली. त्यामध्ये काही अडचणी हया आवश्यक आहेत मात्र सर्वच विभागांनी जादा कर्मचारी वर्ग मागितलेला आहे. प्रत्येक विभागामध्ये आवश्यक कर्मचारी उपलब्ध असुन काही कर्मचारी कामचुकारपणा करतात. सदर कर्मचा-यांकडून कामकाज करुन घ्यावे.

पशू वैद्यकीय विभागातील कर्मचारी गैरव्यवहार करत असल्यास त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी .

पाणीपुरवठा विभागाकडून पाणी पुरवठयाची वेळ वाढवावी.

विद्युत विभागाकडील कर्मचा-याची सार्वजनिक ठिकाणी शाळा, व्यायामशाळा तसेच उद्याने या ठिकाणी तसेच महापालिकेच्या मालकीच्या ठिकाणी विद्युत विषयक पाहणी करावी.

जलनि:सारण विभागाकडून कनिष्ठ अभियंता श्री. रोकडे यांचेकडे प्रभाग क्र. २५ व २९ येथील कामकाज सोपवले आहे. त्यांचेकडे प्रभाग क्र. २८ व २९ चे काम सोपविणेत येऊन प्रभाग क्र. २५,२६ दुस-या कनिष्ठ अभियंता यांचेकडे सोपवावे.

स्थापत्य विभागाकडील कनिष्ठ अभियंता यांनी त्यांचेकडे नेमुन दिलेल्या प्रभागातील आरक्षणातील किती जागा ताब्यात आहेत, किती जागा ताब्यात घ्यावयाच्या आहेत त्याबाबतची माहिती पुढील सभेच्या वेळेस सादर करावी.

तसेच सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्यांवर आवश्यक ती कार्यवाही करावी व त्याबाबत संबंधित नगरसदस्यांना तसे कळविण्यात यावे व प्रभागातील त्यांचे विभागाशी संबंधित तक्रारींचा विनाविलंब निपटारा करावा अशा सूचना देतो तसेच सर्व उपस्थितांचे आभार मानुन माहे नोव्हेंबर २०१७ ची प्रभाग समिती सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-

(कदम शशिकांत गणपत)

**सभापती**

ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी ४११०१७

सही/-

क्रमांक – ड/१३/कावि/४९/२०१७

दिनांक – १७/११/२०१७

**प्रशासन अधिकारी तथा सचिव**,

(सभाशाखा),

ड प्रभाग समिती